महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (नागपूर  मेट्रो  रेल  प्रकल्प)

---

## उद्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने मेट्रो प्रवाश्यांना 30% सूट

## राजपत्रित रजेच्या दिवशी नागपूर मेट्रो तर्फे सवलत




नागपूर : राजपत्रित सुट्ट्यांच्या निमित्ताने मेट्रो तर्फे प्रवाश्यांना सवलत दिली जाते. याच शृंखलेत उद्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने महा मेट्रो नागपूर ने मेट्रो प्रवाश्यांकरता ३० % सूट दिली आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त शहरात विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. कस्तुरचंद पार्क येथे प्रमुख सोहळा होतो तर इतरत्र देखील कार्यक्रम आयोजित केले जातात.

३० % सूट मिळाल्याने मेट्रो प्रवाश्यांना या सर्व कार्यक्रमात सहभाग घेणे तसेच इतरत्र फिरणे अधिकच सोपे होणार आहे. महा मेट्रो द्वारे विविध प्रकारच्या सवलती दिल्या जातात. राजपत्रित सुटीच्या दिवशी मेट्रोच्या माध्यामाने प्रवास करणाऱ्यांना भाड्यात सवलत दिली जाते. २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन) राजपत्रित सुट्टी असल्यामुळे जास्तीत जास्ती नागरिकांनी मेट्रो सेवेचा वापर करावा असे आवाहन महा मेट्रोच्या वतीने करण्यात आले आहे.

• महा कार्डचा वापर वाढला

महामेट्रोच्या महाकार्डचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. महाकार्डने प्रवास करण्याऱ्या प्रवाश्याला 10% सवलत दिली जात आहे. या सवलतीचा लाभ प्रवासी वर्ग सातत्याने घेत असून महा कार्ड चा वापर देखील या निमित्ताने वाढला आहे. महा कार्डमुळे प्रवासी भाड्यात सवलत तर मिळतेच पण या शिवाय तिकीट काढण्याची गरज पडत नसल्याने वेळ देखील वाचतो.